# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०७/०१/२०२१

## <u>मा. महासभा</u>

मा. महासभा सुचना क्र. ०६

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १५/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

मा. महापौर यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

टिप :- सन्मा. पालिका सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, Online महासभेला Join होण्यासाठी खालील काही सुचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुचना |
|---|---|
| 1. | आपणांस ईमेलद्वारे किंवा मोबाईलवर Video Conferencing ची Link पाठविण्यात येईल. |
| 2. | सदर Link ओपन केल्यावर येणारे Zoom Mobile App Download डाऊनलोड करुन Video Conference बैठकीत 15 मिनीटे अगोदर सहभाग घ्यावा. |
| 3. | डाव्या बाजुला खाली Mic च्या Symbol वर Click केल्यावर Call Over Internet चे बटन दाबावे. |
| 4. | सन्मा. पालिका सदस्यांनी सभा Join करताना आपले पूर्ण नाव व प्रभाग क्रमांक टाकून लॉगीन करावी. |
| 5. | सभा सुरु होण्याची वेळ सकाळी ११.०० ची जरी असली तरी सभेस Join होण्याची वेळ सकाळी १०.४५ ची आहे. |
| 6. | सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा More मधील Raise Hand बटनावर Click करावे. यामुळे मा. महापौर यांना समजेल की, आपणास बोलायचे आहे. किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर यांचे परवानगीने बोलावे. |
| 7. | कृपया सभेला Join होण्यासाठी हेडफोनचा वापर करावा. |
| 8. | सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली Link अन्य कोणत्याही व्यक्तीस Share करु नये. |
| 9. | Logout झाल्यास सभेमध्ये पुन्हा सहभागी होण्यासाठी User id आणि Password चा वापर करावा. |
| 10. | काहीही तांत्रिक अडचण भासल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.<br>1) श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर - 8422811399<br>2) श्री. रवी परदेसी - 7977947161 |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. महासभा शुक्रवार दि. १५/०१/२०२१ सभा सुचना क्र. ०६

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| ४४ | दि. २६/०२/२०२० व दि. १३/०८/२०२० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ४५ | मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश व पिटी युनिफॉर्मचा पुरवठा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ४६ | मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्व प्राथमिक बालवाडी शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता शालेय गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ४७ | सन २०२०-२०२१ या वर्षात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत डी.बी.टी. या योजनेद्वारे वाटप वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ४८ | मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता वह्या व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ४९ | सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून दर दोन वर्षांनी महानगरपालिकेच्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरीता छत्र्या, रेनकोट व गमबूट स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत. |
| ५० | भाईंदर (पु.) जैसल पार्क योगध्यान शेड दैनंदिन संचलन व देखभालीसाठी संस्थेस देण्यात मान्यता देणे. |
| ५१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System) राबविणेबाबत. |
| ५२ | राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सन्माननीय महापालिका सदस्यांची नावे व त्यांची व्यक्तीगत माहिती कळविणेबाबत. |
| ५३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत ६०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. (फेरसादर) |
| ५४ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ५५ | मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ ठराव क्र. २८ मध्ये दुरुस्ती करणे. |
| ५६ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेबाबत आढावा घेणे. |
| ५७ | कोविड १९ ने बाधित रुग्णांवर केलेल्या उपचाराबाबत व झालेल्या खर्चाबाबत आढावा घेणे. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०७ जानेवारी २०२१

# मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग

## ।। गोषवारा ।।

मा. महासभा दि. १५/३/२०२१

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विदयार्थ्यांना सन २०२०-२०२१
प्रकरण क्र. ४५ या शैक्षणिक वर्षाकरिता शालेय गणवेश व पिटी युनिफॉर्म चा पुरवठा
करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकुण ३६ प्राथमिक शाळा असुन शाळांमध्ये ७२९२ इतके विदयार्थी/विदयार्थीनी शिक्षण घेत आहेत. सदर विदयार्थी हे गरीब व साधारण कुटुंबातील असल्याने त्यांना महानगरपालिकेकडुन प्रत्येक वर्षी शालेय गणवेश बॅचटाय (प्रत्येकी - २) व पिटी युनिफॉर्म (प्रत्येकी - १) दिला जातो. त्याचप्रमाणे सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात संभाव्य १० टक्के विदयार्थी प्रवेश वाढ गृहित धरुन गणवेश देणे आवश्यक आहे.

शालेय विदयार्थ्यांना "गणवेश संच" थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेमधुन वगळण्याबाबतच्या प्रस्तावास नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.: डीसीटी-२३१८/प्र.क्र.२९/का-१४१७, दि. १२ एप्रिल, २०१८ अन्वये गठीत छाननी समितीने केलेल्या शिफारशी शासनाने मान्य केल्यामुळे नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.: डीसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७, दि. ०५ डिसेंबर, २०१६ "परिशिष्ट-अ" मधील अ.क्र.८ येथे दर्शविण्यात आलेली "गणवेश" ही वस्तु शालेय विदयार्थ्यांच्या बाबतीत (DBT) प्रक्रियेतुन कायम स्वरुपी वगळण्यात आली आहे.

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात मिरा भाईंदर मनपा शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा व पिटी युनिफॉर्म पुरवठा करणेबाबत महापालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा व पिटी युनिफॉर्म पुरवठा करणेकामी अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष शिक्षण अनु. क्र. ०३ सांकेतांक क्र. २५३४ शालेय विदयार्थी, शालेय गणवेश बॅचटाय/पिटी युनिफॉर्म यासाठी रु. ९०,००,०००/- (अक्षरी रु. नव्वद लाख मात्र) तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

सबब, गणवेश व पिटी युनिफॉर्म चा पुरवठा मनपा शाळेतील विदयार्थ्यांना करणेकामी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणस सविनय सादर...

स.पा.वाघमारे
उपायुक्त (शिक्षण)
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग

मा.महासभा दि. २५/९/२०२०

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४८

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका पुर्व प्राथमिक बालवाडी शाळांतील विदयार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शालेय गणवेश पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत पुर्व प्राथमिक बालवाडी एकुण २७ असुन बालवाडया मध्ये अंदाजे ८११ इतके विदयार्थी/विदयार्थीनी शिक्षण घेत आहेत. सदर विदयार्थी हे गरीब व साधारण कुटुंबातील असल्याने त्यांना महानगरपालिकेकडुन प्रत्येक वर्षी शालेय गणवेश दिला जातो त्याचप्रमाणे सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात संभाव्य १० टक्के विदयार्थी प्रवेश वाढ गृहित धरून शालेय गणवेश देणे आवश्यक आहे.

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात पुर्व प्राथमिक बालवाडी विदयार्थ्यांना शालेय गणवेश पुरवठा करावयचा झाल्यास त्यासाठी ई-निविदा करणे आवश्यक असुन बालवाडी विदयार्थ्यांना शालेय गणवेश देणे सोईचे होईल.

बालवाडी विदयार्थ्यांना शालेय गणवेश पुरवठा करणे कामी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष बालवाडी विभाग अ.क्र. ५ बालवाडी गणवेश वाटप लेखा संकेतांक (२५३४) १२,००,०००/- तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

बालवाडी विदयार्थ्यांना शालेय गणवेश पुरवठा करणे कामी ई निविदा प्रक्रिया करुण शालेय गणवेश खरेदी करणेस लागणा-या खर्चास मा.महासभे ची अर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस सविनय सादर ...

(संभाजी वाघमारे)
उपायुक्त (शिक्षण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा समिती दि.१५/१ /२०२१

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४७

**विषय :- सन २०२०-२१ या वर्षात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनांतर्गत डी. बी. टी या योजनेद्वारे वाटप वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरिता आर्थिक व प्रशाकिय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या ३६ शाळा असुन त्यामध्ये इयत्ता १ ते ८ चे ७२९१ विद्यार्थी व विद्यार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ अपेक्षित आहे.

शासन निर्णय क्र.डिसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दि.०५ डिसेंबर, २०१६ नुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये वस्तु स्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणे आवश्यक आहे

सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात अ. क्र. ७) शालेय विद्यार्थ्यांना शालेय दप्तरे, बुट मोजे,वॉटर बॉटल ८०,००,०००/- प्रस्तावित करण्यात आली आहे.

वरील दि. ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयामध्ये कोणताच बदल झालेला नसुन कोविड-१९ च्या प्रादूर्भावमुळे शासन निर्देशानुसार सद्यस्थितीत शाळा चालु झालेल्या नाहीत. फक्त ऑनलाईन वर्ग चालु आहेत. कोविड साथरोगाचा प्रसार विचारात घेता शाळा हया अंदाजित दुस-या सत्रात (दिवाळी नंतर) सुरु होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे मनपा शाळा सुरु होताच विद्यार्थ्यांना (DBT) या योजनेद्वारे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये वस्तु स्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

तरी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वस्तु विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात (शालेय दप्तरे, बुट मोजे) मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा (DBT) करणेकरिता मा. महासभा ची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेस सविनय सादर ....

**(संभाजी वाघमारे)**
**उपायुक्त (शिक्षण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा दि :-१५/१ /२०२१

# ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४८

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांतील विदयार्थ्यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरिता वहया व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी ई-निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकुण ३६ प्राथमिक शाळा असुन इयत्ता १ ली ते ८ वी पर्यत च्या शाळांमध्ये ७२९१ इतके विदयार्थी/विदयार्थीनी शिक्षण घेत आहेत. सदर विदयार्थी हे गरीब व साधारण कुटुंबातील असल्याने त्यांना महानगरपालिकेकडुन प्रत्येक वर्षी इयत्ता १ ते ८ पर्यत वहया व पाण्याच्या बाटल्या दिल्या जातात त्याचप्रमाणे सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात संभाव्य १० टक्के विदयार्थी प्रवेश वाढ गृहित धरुन वहया व पाण्याच्या बाटल्या देणे आवश्यक आहे.

शालेय विदयार्थ्यांना नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.: डीसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७, दि. ०५ डिसेंबर, २०१६ परिशिष्ट-अ मधील दर्शविण्यात आलेली नाही.

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ते ८ पर्यत वहया व पाण्याच्या बाटल्या खरेदी करुन विदयार्थ्यांना पुरवठा करावयचा झाल्यास त्यासाठी ई-निविदा करणे आवश्यक असुन येत्या शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ सुरु झालेनंतर विदयार्थ्यांना इयत्ता १ ते ८ पर्यत वहया व पाण्याच्या बाटल्या देणे सोईचे होईल.

तरी सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात मिरा भाईंदर मनपा शाळेतील विदयार्थ्यांना वहया व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणेकामी अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष शिक्षण अनु. क्र. ०६ सांकेतांक क्र. २५३४ शालेय विद्यार्थी वहया व इतर साहित्य यासाठी रु. ५०,००,०००/- (अक्षरी रु. पन्नास लाख मात्र) व लेखाशिर्ष शिक्षण अनु. क्र. ०७ सांकेतांक क्र. शालेय विद्यार्थी दप्तर/बुट/मोजे/वॉटर बाटल यासाठी रु. ८०,००,०००/- (अक्षरी रु.ऐंशी लाख मात्र) तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

कोविड-१९ च्या प्रादूर्भावमुळे शासन निर्देशानुसार सद्यस्थितीत शाळा चालु झालेल्या नाहीत. फक्त ऑनलाईन वर्ग चालु आहेत. कोविड साथरोगाचा प्रसार विचारात घेता शाळा हया अंदाजित दुस-या सत्रात (दिवाळी नंतर) सुरु होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे मनपा शाळा सुरु होताच विदयार्थ्यांना इयत्ता १ ते ८ पर्यत वहया व पाण्याच्या बाटल्या देणे सोईचे होईल.

इयत्ता १ ते ८ पर्यत मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना वहया व पाण्याच्या बाटल्या पुरवठा करणे कामी ई निविदा प्रक्रिया करूण साहित्य खरेदी करणेस लागणा-या खर्चास मा. महासभा ची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस सविनय सादर......

(संभाजी वाघमारे)
उपायुक्त (शिक्षण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## // गोषवारा //

## मा. महासभा दि. १५ /०७/2020

८९

**प्रकरण क्र. :- सन 2021-22 या वित्तीय वर्षापासुन दर दोन वर्षांनी महानगरपालिकेच्या वर्ग- 4 कर्मचा-यांकरिता छत्र्या, रेनकोट व गमबूट वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग 1 ते 4 मधील अधिकारी/ कर्मचारी (स्त्री-पुरुष) कार्यालयात काम करतात त्यांना छत्री व जे कर्मचारी (स्त्री-पुरुष) प्रत्यक्ष साफ-सफाई, प्लंबिंग, गार्डनिंग, निरीक्षक, मीटर लिडर, वॉलमेन, पंप ऑपरेटर, फेरीवालापथक, अतिक्रमण निर्मुलन, वैद्यकीय सेवा व इतर अत्यावश्यक सेवेत काम करत आहेत त्यांना रेनकोट व गमबूट वस्तुरुपाने पावसाळी साहित्य यापुर्वीपासुन दर दोन वर्षांनी देण्यात येत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-1, वर्ग-2, वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचा-यांना पावसाळी साहित्य (छत्र्या, रेनकोट, गमबुट) पुरवठा करणेकामी online ई-टेडरिंगव्दारे निविदा मागविणेकामी गरजेचे आहे. परंतु Covind-19 चे लॉकडाऊन लक्षात घेता निविदा मागविणेकामी बराचसा कालावधी लागणार आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-2020/प्र.क्र..65/अर्थ-3 दि. 04 मे 2020 अन्वये खरेदी 12 ब) प्राधान्यक्रम नसलेल्या विभागांना कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यंता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असली तरी निविदा प्रसिध्दी करता येणार नाही. मात्र औषधे अत्यावश्यक, वैद्यकीय उपकरणे व त्यांचा पुरवठा इ. खरेदीसाठी खर्च करण्यास मुभा राहील. क) चालू आर्थिक वर्षात कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तुंच्या मर्यादीत खरेदीकरिता, वितरित निधीच्या 75% च्या मर्यादेत, अनुमती राहील.

शासन निर्णय परिच्छेद 2 शासकीय विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) / स्थानिक स्वराज्य संस्था मंडळे/ महामंडळे यांना जर कल्याणकारी योजनेअंतर्गत कोणतीही वस्तु/ साधनासामुग्री दयावयाची असल्यास त्यांनी या शासन निर्णयाच्या अनुषंगाने निश्चित केलेल्या कार्यपध्दती **"अ ते औ"** प्रमाणे धोरण निश्चित केलेले आहे. त्याअनुषंगाने परिच्छेद 3 मधील 1 ते 7 वस्तुस्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान दिल्यास लाभार्थ्यांना फायदे होणे शक्य आहे.

त्याअनुषंगाने शासन निर्णय क्रमांक: डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417 दि. 05/12/2016 नुसार शासनाव्दारे लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लाभार्थ्यांना योजनांचा पुर्णपणे लाभ मिळेल आणि अनावश्यक गोष्टी टळू शकतील. सद्यस्थितीत डीबीटी अंतर्गत अनेक योजना अंतर्भूत असुन या सर्व योजनांमध्ये रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात येते. हे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होते. उदा. शिष्यवृत्ती, रोजगार हमी योजनेअंतर्गत मिळणारे वेतन, पेन्शन योजना, घरगुती गॅसवरील अनुदान इ.

त्यामुळे DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. DBT च्या दुस-या प्रकारामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाव्दारे वस्तु स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे. त्या ठिकाणी वस्तु स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे. शासन निर्णयानुसार परिशिष्ट अ मधील अ.क्र. 37 (छत्री व रेनकोट) व अ.क्र. 42 (पादत्राणे (Shoes) खरेदी करणेबाबत मा. आयुक्त व मा. अतिरिक्त आयुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार कर्मचा-यांना रोख रक्कम देण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तसेच देशात, महाराष्ट्रात मिरा भाईंदर शहरात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव व कोरोनाच्या उपाययोजनांवर होणारा खर्च विचारात घेता यावर्षी मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत असलेले वर्ग 1 ते 3 च्या अधिकारी / कर्मचा-यांना पावसाळा साहित्य देणे योग्य होणार नाही. त्यामुळे त्यांना साहित्य देऊ नये. वर्ग -4 चे कर्मचारी जे फिल्डवर असतात त्यांनाच पावसाळी साहित्य उदा. छत्र्या, रेनकोट व गमबूट देणे योग्य राहिल.

सन 2020-21 या वित्तीय वर्षाकरिता प्रत्येक खातेप्रमुखाने आपल्या विभागात कार्यरत असलेल्या वर्ग-4 चे कर्मचारी यांची यादी निश्चित करुन व उक्त लाभार्थी कर्मचारी यांनी खरेदी केलेल्या वस्तुच्या पावतीची शहनिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या आधार क्रमाकांशी निगडीत बँक खात्यात रोख रक्कम जमा करण्याची कारवाई करणेस व या साहित्य वाटपास येणा-या खर्चास मा. स्थायी समितीने ठराव क्र. 26 दि. 17/08/2020 अन्वये मंजुरी देऊन मा. महासभेची कार्योत्तर मंजुरी घेणेकामी मा. स्थायी समितीने ठराव पारित केलेला आहे.

त्याअनुषंगाने सन 2020-21 या वित्तीय वर्षात सुध्दा सदर पावसाळी साहित्य देण्याचे निश्चित केलेले आहे. परंतु कोरोना महामारीमुळे निविदा प्रक्रिया पुर्ण करणेस विलंब होत असल्यामुळे व कर्मचा-यांना आपल्या पसंतीची वस्तु घेण्याची संधी उपलब्ध होणेकरिता व लाभार्थी कर्मचा-यास वस्तुच्या खरेदी प्रक्रियेमुळे तसेच वस्तुच्या गुणवत्तेबाबत निर्माण होणा-या बाबी अनियमितता व उपस्थित होणारे प्रश्न रोख स्वरुपात थेट लाभ देण्याच्या पारदर्शक प्रक्रियेमुळे टळू शकतील या उद्देशाने उपरोक्त शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी (स्त्री-पुरुष) वर्ग 4 करिता छत्र्या, रेनकोट व गमबूट वस्तु स्वरुपात देण्याऐवजी रोख स्वरुपात थेट लाभार्थी कर्मचा-यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबत निश्चित केलेले आहे.

सदरबाबत सर्व खातेप्रमुखास परिपत्रकाव्दारे कळविणे आवश्यक होते. त्यानुसार परिपत्रकाचा मसुद्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. 28/09/2020 रोजी मान्यता दिलेली आहे. परंतु मा. अतिरिक्त आयुक्त यांनी ह्या वर्षीचा पावसाळा जवळपास संपलेला आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी पावसाळा सुरु होताना करण्यात येणेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

तरी सन 2021-22 या वित्तीय वर्षापासुन दर दोन वर्षांनी Gem पोर्टलवरील दरानुसार खालीलप्रमाणे दिलेल्या अनुदान रक्कमेच्या मर्यादेपर्यंत महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थायी कर्मचारी वर्ग- 4 चे 898 कर्मचारी कार्यरत असुन विभागप्रमुखांनी केलेल्या शिफारसीनुसार जे सफाई

कर्मचारी फिल्डवर काम करतात अशा कर्मचा-यांकरिता छत्र्या, रेनकोट व गमबूट वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेकामी सन 2021-22 या आर्थिक वर्षापासुन दर दोन वर्षांनी "कर्मचारी गणवेश व पावसाळी साहित्य" या लेखाशिर्षा अंतर्गत अंदाजित रु. 10,00,000/- पर्यतच्या मर्यादेत येणा-या खर्चास मा. स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरीच्या अधिन DBT धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**वस्तु विकत घेण्यासाठी ठरविण्यात आलेली रकमेचा तपशील**

| प्रत्यक्ष साईटवर काम करणारे चतुर्थश्रेणी कर्मचारी | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **स्त्री-पुरुष** | **अनुदान रक्कम (GST सह)** |
| 1. | रेनकोट | रु. 450/- मर्यादेपर्यंत |
| 2. | गमबूट | रु. 550/- मर्यादेपर्यंत |
| 3. | छत्री | रु. 300/- मर्यादेपर्यंत |

**(दिलीप ढोले)**
**अति-आयुक्त (भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मिळकत विभाग

मा. महासभा सभा दि. १५/०१/२०२१

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक ( ५० ) :- भाईंदर (पु.) जैसल पार्क योगध्यान शेड दैनदिन संचलन व देखभालीसाठी संस्थेस देण्यात मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जैसलपार्क येथे योग ध्यान शेड असुन सदर जागा दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थेत देण्याकरीता मा.महासभा दि.7/6/2019 ठराव क्र.20 अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार निविदा प्रकिया करुन संस्थेची मा.महासभेच्या मान्यतेने निवड करण्यात आली होती. तथापी सदर संस्थेने अनामत रक्कम भरुन करारनामा न केल्याने नव्याने अर्ज मागविण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

मे.योगध्यान धारणा फाऊडेंशन, भाईंदर (प.)

सदर संस्थेने आवश्यक सर्व कागदपत्राची पूर्तता केली असुन त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी सदर शेड मध्ये योगध्यान चे संचलन करणेस, तसेच शेड ची देखभाल व दुरुस्ती स्वखर्चाने करण्याकरीता करारनाभा करुन काम देण्यास शिफारस आहे.

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/०१/2021

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ५७ )** - मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System) राबविणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने नागरीकरण वेगाने होऊन लोकसंख्या देखिल वेगाने वाढत आहे. शहरातील रस्ते हे वाहतुकीस कमी पडत असल्याने रस्ता रुंदीकरण करणे, रस्त्याचे कॉक्रीटीकरण, विकास योजनेतील अविकसित रस्ते तयार करणे इ. कामे करण्यात येत असतात. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास पर्यावरणशील शहर म्हणून व्हावा, कमीत कमी इंधनाचा वापर करणे, आरोग्यवर्धक म्हणून वाहतूक व्हिजनचा भाग म्हणून "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System) राबविणेचा प्रकल्प हाती घ्यावयाचा आहे. याव्दारे शहरात सायकलिंगला प्राधान्य देऊन पर्यावरणाशी बांधिलकी जपण्याचा प्रयत्न असून यामधून नागरीकांना प्रदुषणमुक्त, सुरक्षित, सुखदायी, सोईस्कर व परस्परांशी जोडणारी सहज सोपी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन दिली जाणार आहे. यामधून शहरातील आधुनिक जीवन प्रणालीमुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्या लक्षात घेऊन आरोग्यमय जीवनासाठी सायकलिंग हा उत्तम पर्याय खुला करुन दिला जाणार आहे.

सध्या जागतिक स्तरावर "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" ही शहराच्या वाहतुक व्यवस्थेच्या नियोजनात मुख्य भूमिका बजावित असून यामध्ये शहरात सायकलचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढविणे तसेच जेव्हा आणि जिथे आवश्यकता असेल तिथे सायकलींची उपलब्धता करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका या धोरणाद्वारे "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" च्या माध्यमातून नागरिकांमध्ये सायकलींगची आवड विकसित करून शहराच्या पर्यावरण संवर्धनाला गती देऊ इच्छिते. ही प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी पुढील 3 पर्याय उपलब्ध आहेत. -

अ) संपूर्णपणे महानगरपालिकेमार्फत प्रणालीची अंमलबजावणी

आ) महानगरपालिकेच्या आर्थिक सहकार्याविना खाजगी संस्थेकडून अंमलबजावणी

इ) खाजगी संस्थेकडून अंमलबजावणी करताना महानगरपालिकेचा आर्थिक वा इतर स्वरुपाचा सहभाग

यापैकी एक पर्याय निवडताना उपलब्धता व प्रवाशांची गरज यांचा विचार होणे गरजेचे आहे. ही प्रणाली राबविताना शहरातील सर्व विभागांना सामावून घेईल व सर्व आर्थिक स्तरातील समाज घटकांना परवडेल अशाप्रकारे उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट आहे.

**खाजगी संस्थाकरीता धोरण :-**

ज्या कंपन्या "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" चालविण्यासाठी इच्छुक आहेत त्यांनी ही प्रणाली राबविण्यासाठी सक्षम असल्याबद्दल आश्वस्त केले पाहिजे व तशा प्रकारचा सामंजस्य करार (Memorandum of Understanding) मिरा-भाईंदर महानगरपालिकेसोबत करावयाचा आहे.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका संचलित प्रणाली धोरण :-**

खाजगी संस्थांमार्फत ही प्रणाली राबविली जात असेल तर मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत या सेवेबाबत नियमित मुल्यमापन केले जाईल. जर पूर्णत: अथवा अंशत: स्वरुपात अशा प्रकारची प्रणाली राबविण्यासाठी शहरातील एखादी खाजगी संस्था उपलब्ध होणार नाही अथवा अशी प्रणाली राबविणारी खाजगी संस्था सर्व विभागातील नागरिकांना समाधानकारक सेवा पुरवू शकत नसेल किंवा नागरिकांना आर्थिक दृष्टया न परवडणारी अथवा दर्जाहीन सेवा देत असेल तर मिरा-भाईंदर महानगरपालिका स्वत: पुढाकार घेऊन "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" राबवेल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे अशावेळी सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी खाजगी सेवा पुरवठा धारक यांचे सहकार्य घेणे अथवा PPP किंवा आवश्यक अथवा उपयुक्त ठरेल अशी सेवा उपलब्ध करुन घेण्याचा पर्याय असेल.

**PBS प्रणालीची उद्दीष्ट पातळी :-**

आगामी 3 वर्षात मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" ची खालीलप्रमाणे उद्दीष्ट पातळी अपेक्षित धरलेली आहेत.

PBS सायकल संख्या - 100 नागरीकांमागे 1 सायकल अथवा साधारणत: मिरा-भाईंदर शहरात 8000 सायकलची उपलब्धता.

PBS सायकल फेऱ्यांची संख्या - प्रत्येक दिवसाला प्रत्येक सायकलच्या 4 फेऱ्या.

**सायकल क्षेत्र :-**

PBS प्रणालीमध्ये विविध विभागात विशिष्ट सायकल क्षेत्रे तयार करुन त्या ठिकाणी संपुर्ण स्वयंचलीत (Automated) यंत्रणेव्दारे सायकल घेणे आणि ठेवणे यांचे नियंत्रण केले जाईल. याकरीता सध्या प्रचलित असलेल्या अत्याधुनिक "डॉकलेस (Dockless)" प्रणालीचा वापर केला जाईल, ज्यायोगे सायकल्स चालविण्याकरीता घेताना स्मार्टफोन अथवा तशा प्रकारच्या ग्राहकांव्दारे नियंत्रित होणाऱ्या तंत्रप्रणालीचा उपयोग करण्यात येईल. म्हणजेच एका ठिकाणाहून सायकल घेताना व प्रवासानंतर दुसऱ्या स्थळी ठेवताना तिची लॉकींग प्रणाली ग्राहकाव्दारे नियंत्रित होईल.

या सायकल झोनमध्ये पार्क केलेल्या सायकलीकरीता कोणतेही शुल्क अथवा पार्कींग रक्कम आकारली जाणार नाही. सायकल झोनच्या जागांमध्ये नागरिकांची सोय लक्षात घेवून, आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील. सायकल झोन विकसीत करणेकरीता आवश्यक कामे करणे, ठराविक आकारात व स्वरुपात माहिती फलक लावणे इत्यादी सुविधा महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. नागरिकांना सुलभ रितीने सायकल चालविण्यासाठी शहरातील रस्त्यांवर सायकल ट्रॅकची निर्मिती केली जाईल.

याशिवाय नागरिक वापर करीत असलेल्या PBS सायकल विशिष्ट ठिकाणीच ठेवाव्यात याकरीता शहरातील सर्वच विभागात विशिष्ट ठिकाणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत "सायकल क्षेत्रे" जाहिर केली जातील.

जर एखाद्या नागरिकाने जाहिर सायकल क्षेत्रांमध्ये सायकल न ठेवता इतरत्र कुठेही ठेवल्यास त्याचा त्रास वाहतुकीला व रहदारीला होऊ शकतो. ही शक्यता लक्षात घेऊन अशावेळी ती सायकल उचलण्याचे व त्याचा दंड संबंधित प्रवासी नागरीकाकडून वसुल करण्याचे अधिकार मिरा-भाईंदर महानगरपालिकेस असतील.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत वाहतुक पोलीस विभागाच्या सहयोगाने अशी सायकल क्षेत्रे निश्चित करुन त्याची माहिती नागरिकांपर्यंत वेळोवेळी पोहचवली जाईल.

**सुरक्षा :-**

PBS प्रणालीमध्ये सायकलींची चोरी अथवा सायकलींची हानी याची सर्वात मोठी अडचण जाणवते. याद्दष्टीने PBS प्रणाली ही नागरिकांच्या आरोग्यासाठी व शहराच्या पर्यावारण संवर्धनासाठी राबविली जाणारी उत्तम सुविधा असल्याची जागृती नागरिकांमध्ये केली पाहिजे व ही सार्वजनिक मालमत्ता असून तिचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे ही भावना निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. यामध्ये पोलिस विभागाचे अनमोल सहकार्य मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत घेण्यात येईल.

**विमा संरक्षण :-**

PBS प्रणाली वापरणाऱ्या सायकलपट्टूंना विमा संरक्षण उपलब्ध करुन देणेचे जबाबदारी संबंधित संस्थेची असले.

**जाहिरात :-**

PBS प्रणाली एजन्सी सायकलवर जाहिरात करुन शकेल मात्र सदर जाहिरात वाहतुकीला अडथळा होईल अशा प्रकारे सायकलच्या आकारमानापेक्षा जास्त असणार नाही तसेच सदर जाहिराती तंबाखू, मद्य अथवा धुम्रपान अशा प्रकारे हानीकारक व नैतिक मुल्यांना हानी पोहचविणाऱ्या नसाव्यात.

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेची जबाबदारी :-**

मिरा-भाईंदर शहरात जन सायकल सहभाग प्रणाली राबविणेबाबत महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार असणार नाही. सदर प्रणालीचे निगा देखभाल व व्यवस्थापन करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थेची असेल. सदर प्रणाली राबविणेकरीता प्रथमत: 20 X 5 फुट क्षेत्राची जागा प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल व सदर प्रणालीस नागरीकांचा जसा-जसा प्रतिसाद मिळेल त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध विभागात आवश्कतेनुसार जागेचे क्षेत्र व संख्या वाढविण्यात येईल. या ठिकाणच्या जाहिरातीतुन प्राप्त होणारा जास्तीत-जास्त महसूल देणाऱ्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

तरी प्रस्तावित केल्यानुसार,

1) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "जन सायकल सहभाग प्रणाली (Public Bicycle Sharing System)" प्रथमत: प्रायोगिक तत्वावर राबविण्यासाठी महानगरपालिकेच्या आर्थिक सहकार्याविना खाजगी संस्थेकडून RFP (Request for Proposal) मागवावे लागेल.
2) RFP (Request for Proposal) व जाहिरातीद्वारे प्राप्त प्रस्तावानुसार जास्तीत जास्त देकार नमुद करणाऱ्या संस्थेची निवड करुन त्यांचे समवेत करारमुल्य व कराराच्या अटी शर्ती आणि कालावधी निश्चित करण्यात येईल.
3) आवश्यकतेनुसार सायकली ठेवणेसाठी विविध ठिकाणी जागा उपलब्ध करुन देणे.

वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

4/11/19.

**(बालाजी खतगांवकर)**

**आयुक्त**

मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2019-20/MG-5

मा.महासभा दि. १५/१/२०२१

प्रकरण क्र. ५२

महाराष्ट्र शासन

## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,ठाणे ( नेरुळ )

प्लॉट नं.१२, सेक्टर,११ , सेंट ऑगस्टीन हायस्कुल समोर , नेरुळ (पु) ,नवीमुंबई -४००७०६ दुरध्वनी क्र. (०२२) -२७७०६७०४

Website - https://dol.maharashtra.gov.in Email- dolthane.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.जिग्रंआकाठाणे/राग्रंप/२०२०-२१/ २५०८-११ दिनांक : ०४.११.२०२०

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. २२/२०२०-२१
दिनांक :- ०८/११/२०२०

अत्यंत महत्वाचे/तातडीचे

प्रति,

मा.आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका,इंदिरा गांधी भवन,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग भाईंदर (प),मीरा-भाईंदर ,महाराष्ट्र -४०१ १०१

मनपा सचिव

विषय : राज्य ग्रंथालय परिषदेची पुर्नरचना करणेसाठी सन्माननीय महापालिका सदस्यांची नावे व त्यांची व्यक्तीगत माहिती कळविणेबाबत

संदर्भ : ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३४/राग्रंपपु/२०२०-२१/३२०७-३२४८ दिनांक ०३.११.२०२०

महोदय,

वरील विषयासंदर्भात सादर करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम,१९६७ चे प्रकरण २ कलम ३ (आठ) मध्ये महाराष्ट्र राज्यात कार्य करीत असलेल्या महानगरपालिकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ,राज्य सरकारने नामनिर्देशित केलेला एक इसम नियुक्त करण्याची तरतुद आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून महानगरपालिकेवर निवडून आलेल्या सन्माननीय सदस्यांमधून ग्रंथालयाविषयी आवड असलेल्या जास्तीत जास्त तीन सदस्यांची नावे सोबतच्या विवरणपत्रात दिनांक २७ नोव्हेंबर,२०२० पर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,ठाणे (नेरुळ) यांच्याकडे सादर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपला विश्वासु,

( प्रशांत पाटील )

जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ठाणे

सोबत : नमूना विवरणपत्र

प्रत माहितीसाठी :

१. मा.ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय ,मुंबई -०१

२. मा.सहाय्यक ग्रंथालय संचालक,मुंबई विभाग,कोंकणभवन,मुंबई

राज्य ग्रंथालय परिषदेवर निवडीसाठी सन्माननीय नगरपालिका सदस्यांची माहिती असलेले विवरणपत्र

| अ.क्र. | तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|
| १) | सन्माननीय नगरपालिका सदस्यांचे नाव | |
| २) | जन्म दिनांक | |
| ३) | शैक्षणिक अर्हता | |
| ४) | विद्यमान सदस्यत्वाचा कालावधी दिनांकासह | |
| ५) | सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत योगदान असल्यास थोडक्यात माहिती | |
| ६) | अन्य शैक्षणिक उपक्रमात सहभागी असल्यास थोडक्यात माहिती | |
| ७) | विद्यमान कालावधीत शासन नियुक्त समितीवर काम करीत असल्यास त्याचा तपशिल | |
| ८) | यापूर्वी शासन नियुक्त समितीवर काम केले असल्यास त्याचा तपशिल | |
| ९) | अन्य उपयुक्त माहिती असल्यास थोडक्यात नमूद करावी. | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५ / ९ /2020

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (५३) - **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास योजनेमध्ये भाईंदर (पश्चिम) परिसरातून वसई खाडी ते मिरारोड (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीपर्यंत 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम 37 (1) अन्वये कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रस्तावित फेरबदलास मा. महासभेने यापुर्वी प्रकरण क्र.64, ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानंतर सदर प्रस्तावित फेरबदलाबाबत मा. महासभेस प्रकरण क्र.86, ठराव क्र.102 दि.20/02/2020 अन्वये फेरबदल प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर फेरबदलाच्या अनुषंगाने महापालिकेने स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.20/06/2020 रोजी व मा. राजपत्र महाराष्ट्र शासन यामध्ये जुन 18-24, 2020 याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. प्रसिद्ध अधिसुचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुचना / हरकती प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त सुचना / हरकतीच्या अनुषंगाने दि.21/08/2020 रोजी संबंधितांस सुनावणीस बोलाविण्यात आले होते. उपस्थित हरकतदार / सुचनाधारक यांनी सुनावणी दरम्यान त्यांचे लेखी व तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित विकास योजना रस्त्या व्यतिरिक्त (सोबतच्या नकाशातील हिरवा रंग) त्यालगत दुसरा रस्ता (सोबतच्या नकाशातील गुलाबी रंग) प्रस्तावित केलेला आहे व त्या अनुषंगाने नवीन प्रस्तावित रस्त्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करणेकरीता कळविलेले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी 45.00 मी. रुंद नविन रस्ता प्रस्तावित केला आहे. तथापि मा. महासभा ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) च्या मंजुरी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारारस्ता 60.00 मी. रुंद याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

जुन्या प्रस्तावित आखणीमध्ये नविन 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता दहिसर लिंक रोड म्हणून दर्शवून तद्अनुषंगाने फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. नवीन रस्त्याची आखणी ही जुन्या प्रस्तावित 60.00 मी. रस्त्याची आखणी आरक्षण क्र. 91 (स्टेडिअम) पासून दक्षिणेकडे (दहिसर च्या बाजुला) विलग होत आहे.

वरील अहवालात नमुद केल्याप्रमाणे जुनी प्रस्तावित फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (M.M.R.D.A.) यांनी दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केलेली नविन आखणी हि लगतच्या परिसरातून जात असल्याने सदर आखणीखालील जागेचे व जुन्या आखणीतील बहुतांश जागामालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधक सामाईक असून नवीन जागेतील बाधीत होणारे मालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधी यांस दि.12/10/2020 रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. सादर सुनावणीच्या अनुषंगाने उपस्थितांनी त्यांचे लेखी तसेच तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

सबब प्रस्तावित मुळ फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेली आखणी (गुलाबी रंग) यांस मंजुरी मिळणेच्या अनुषंगाने शिफारस असून सदर आखणी अंतिम मंजुरीकरीता मा. महासभेसमोर सादर करण्यात येत आहे.

(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/ ९ /2029

## गोषवारा

प्रकरण क्र. ५४

विषय :- ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: अभियो-1312/प्र.क्र.30/पुर्नबांधित-1/11अ, दि.12 फेब्रुवारी, 2013 मधील परिच्छेद 9(क) नुसार लाचेचा सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी असे आदेश आहेत. या आदेशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील नियम 4 नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(2) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सेवेतून निलंबीत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील."

श्री. महादेव नरसिंह बंदिछोडे, लिपीक, प्रभाग कार्यालय क्र.05, कर विभाग यांचेबाबत जा.क्र.मनपा/आस्था/1064/2020-21, दि.13/10/2020 रोजीच्या आदेशान्वये मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील नियम 59-अ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ नुसार मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दि. १२/०१/२०२१

**मा. महासभा दि. १५/०१/२०२१**

**पुरक घोषणा**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ----------------------------------------

नगरसेवक/नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १५/०१/२०२१ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५८ | सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दिनांक ०८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>----------<br>मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणाऱ्या संगणक चालक तथा लिपीक व लघुलेखक यांना समान काम समान वेतन कायद्याअंतर्गत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करणेबाबत. |
| ५९ | सन्मा. सदस्या श्रीम. गीता भरत जैन यांचा दिनांक ११/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>----------<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेचे १०० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान केलेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन प्रचलित कायद्याच्या कलमानुसार फौजदारी कारवाई प्रस्तावित करुन चौकशी करणेबाबत. |
| ६० | सन्मा. सदस्य श्री. अनिल सावंत यांचा दिनांक ११/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>----------<br>मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मिय उत्सव व विविध कार्यक्रमासाठी मंडप, लाईट, स्टेज, टेबल, खुर्ची, पार्टीशन स्पीकर सेट, जनरेटर, रेलींग व मनपा निवडणूक व्यवस्था (अंदाजित खर्च रु. १२,७१,१८,६६४) ही निविदा त्वरीत रद्द करुन जाचक अटी काढून नवीन निविदा काढणेबाबत. |
| ६१ | सन्मा. सदस्य श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचा दिनांक ११/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>----------<br>स्व. भारतरत्न इंदिरा गांधी हॉस्पीटलच्या इमारतीचे सुरु असलेले दोन मजले वाढविण्याचे निकृष्ठ दर्जाच्या बांधकामाकरीता विभाग अधिकारी, कन्सलटंट, आर्किटेक्ट, थर्ड पार्टी ऑडीटर आणि ठेकेदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन बांधकाम विभागाच्या कार्यपध्दतीची सखोल चौकशी लावणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मनपा/सचिव/पु.घो./१/११/२०२०-२१
दि. ०८/०१/२०२१

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.प./न.प./न.व.(पुरक घोषणा)
आवक क्र. १-११/२०२०-२१
दिनांक:- ०८/ ०१/२०२१

# प्रशांत ज्ञानदेव दळवी

## सभागृह नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/स.ने./७५१/२०२०-२१ दि. ०८/०१/२०२१.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण २, ज अन्वये प्रस्ताव**

प्रकरण क्र. ५८ करिता

**प्रति,**
**मा. नगरसचिव सो.**
**सचिव विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार मानधनावर कार्यरत असणाऱ्या संगणक चालक तथा लिपिक व लघुलेखक यांना समान काम समान वेतन कायद्याअंतर्गत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :- मा. तहकुब महासभा दि.१९/०१/२०१९ व मा. महासभा दि.१३/०२/२०१९, प्रकरण क्र. ११३, ठराव क्र. ११० ची अंमलबजावणी करणेबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक तथा लिपिक व लघुलेखक यांची नेमणूक दि.२८/०२/२००७ रोजी करण्यात आलेली आहे. या आदेशान्वये एकुण ८७ संगणक चालक तथा लिपीक व ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर नेमणूक करण्यांत आली होती. त्यापैकी सद्यस्थितीत ६५ संगणक चालक व ३ लघुलेखक विविध विभागात कार्यरत आहेत.

आस्थापनेवरील कार्यरत संगणक चालक तथा लिपीक यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर काम करणेस नियुक्ती देताना देण्यांत आलेल्या नियुक्ती पत्रात **"संगणक चालक तथा लिपीक"** असे नमुद करुन त्याना कामावर रुजु केलेले आहे. **"संगणक चालक तथा लिपीक"** हे पद लिपीक टंकलेखक या पदास समकक्ष आहे.

सदरचे कर्मचारी यांनी आतापर्यंत विविध विभागात उत्कृष्ट कामकाज केले असून सदर कर्मचारी यांनाच मुदतवाढ देऊन कार्यरत ठेवणेकरीता महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे विभागप्रमुख यांनी आस्थापना विभागास पत्र दिलेले आहेत. तसेच लोकसभा/ विधानसभा निवडणूक, महानगरपालिकेच्या निवडणूका, जनगणना इतर राष्ट्रीय कार्यक्रमासह मागील वर्षात कोरोना काळात सदर कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट काम केले आहे.



मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, दुसरा माळा, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१ दूरध्वनी क्र. : 022-2814 8899
कार्यालय : सी/१४–१०१, सेक्टर – ४, शांतीनगर, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे – ४०१ १०७ दूरध्वनी क्र. : 022-2812 8777
Mob. : 9867708777 Email : prashantdalvi.pd21@gmail.com Web Site – www.prashantdalvi.com

# प्रशांत ज्ञानदेव दळवी
## सभागृह नेता
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहे जानेवारी २०१९ मध्ये याबाबत सदर कर्मचारी हे लिपीक पदाचे काम करीत असल्याचा अहवाल संबधित विभाग प्रमुख यांचेकडुन घेणेबाबत तत्कालीन उप-आयुक्त (मु.) यांनी निर्देश देखील दिलेले होते. परंतु आज दोन वर्षाचा कालावधी उलटून देखील यावर आस्थापना विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. २१३/२०१३ च्या निर्णयानुसार समान काम समान वेतन धोरणनुसार वेतन देणे बाबत निर्णय पारीत झाला आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या विधी अधिकारी यांनी "आस्थापना विभागाने अस्थायी संगणक चालक यांची नियुक्ती संगणक चालक/ लिपीक अशी केल्याचे नमुद केलेले असल्यामुळे अस्थायी संगणक चालक यांना लिपीक या पदाचा Pay-scale लावणे बाबतची कार्यवाही करणेस योग्य वाटते." असा अभिप्राय दि. ११/०१/२०१९ रोजी दिलेला आहे.

या संदर्भात मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उपरोक्त विषयान्वये ठराव मंजूर झालेला आहे. याउपर या ठरावाची तंतोतंत अंमलबजावणी न करणे हा सर्वोच्च न्यायालयाचा तसेच मा. महासभेचा घोर अवमान मानला जात आहे. सदरहू बाब अतिशय गंभीर असल्याने या ठरावाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी असा मी "ज" अन्वये प्रस्ताव मांडत आहे.

आपला विश्वासू,

Dalvi

प्रशांत ज्ञानदेव दळवी
सभागृह नेता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, दुसरा माळा, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१ दूरध्वनी क्र. : 022-2814 8899

कार्यालय : सी/१४–१०१, सेक्टर – ४, शांतीनगर, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे – ४०१ १०७ दूरध्वनी क्र. : 022-2812 8777
Mob. : 9867708777 Email : prashantdalvi.pd21@gmail.com Web Site – www.prashantdalvi.com

मुरकघोष्णा/२/२२/२०२०-२१, दि. ११/१/२०२१
श्रीमती गीता भरत जैन
महाराष्ट्र विधानसभा
आमदार – मिरा भाईंदर
Mob.: 9820502299 / 8108602299
मिठालाल जैन बंगलो, शोप नं. ८, ग्राउंड फ्लोर, न्यु गोल्डन नेस्ट, फेज–१३, १०० फीट रोड, भायंदर (पूर्व), ठाणे – ४०१ १०५
• Tele.: 2819 8888 Follow on : GeetaBJain • Email: geetajainoffice@gmail.com • www.geetajain.com

Ref.: GBJ/19/2021

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ...२२-२०२०-२१
दिनांक:- ११/ १ /२०२१

Date : 11/01/2021

प्रकरण क्रमांक:-५८ (किता)

प्रति,

मा. नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महासभा सूचना क्र. ६ अन्वये आयोजित मा. महासभा शुक्रवार दिनांक १५/०१/२०२१ साठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्र.क्र.२/१ (ल) साठी "ज" अन्वये प्रस्ताव...**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ व १३२ अन्वये शहरातील मोकळ्या जागेवर कर लावण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र. ८ दिनांक १०/०४/२००८ रोजी संबंधित कर आकरणी संदर्भात ठराव पारित केला आहे. ठरावाच्या अनुषंगाने तात्कालीन आयुक्त ह्यांनी जा.क्र.मनपा/आयुक्त/१५३/२००८-०९ दिनांक २३/१२/२००८ रोजी कर वसुलीचे आदेश पारित केलेले आहेत. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे;

१) मोकळ्या जागेवर केलेली कर आकारणीची वसुली करण्याचे काम नगररचना विभागास नेमून देण्यात येत आहे.

२) कर विभागाकडून केलेली कर आकारणीची मालमत्ता धारकांकडून वसुली नगररचना विभागाने करावयाची आहे. त्यासाठी कर विभागाने आवश्यक ते सहकार्य करावे.

३) ज्या जमीन मालकाने मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केला नाही, अशा जमीन मालकास जोत्याचा दाखला, सुधारित आराखडा, वापर परवाना (भोगवटा दाखला) व इतर परवाने देऊ नये.

महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

# श्रीमती गीता भरत जैन

आमदार – मिरा भाईंदर

Mob.: 9820502299 / 8108602299

मिठालाल जैन बंगलो, शोप नं. ८, ग्राउंड फ्लोर, न्यु गोल्डन नेस्ट, फेज–१३, १०० फीट रोड, भायंदर (पूर्व), ठाणे – ४०१ १०५

• Tele.: 2819 8888 Follow on : GeetaBJain • Email: geetajainoffice@gmail.com • www.geetajain.com

Ref.: Date :

असे असतानाही नगररचना विभागातील विभाग प्रमुख नगररचनाकार श्री.दिलीप घेवारे आणि सत्यवान धनिगावे ह्यांनी एकंदर ३८३ प्रकरणात मोकळी जागा कर आकरणी न करताच संबंधित भूविकासकास जोत्याचा दाखला, सुधारित बांधकाम आराखडा, सुधारित बांधकाम परवानग्या देऊन ८१ कोटी रुपयाचा फायदा पोहचविला आहे. तर १०७ प्रकरणात चक्क भोगवटा दाखला देऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेचे १६ कोटी ४० लाख रुपयाचे असे एकंदर ९७.४३ कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार केला आहे. संबंधित प्रकरणी ह्या दोन्ही अधिकाऱ्यांवर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या १०० कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत जबाबदार धरून प्रचलित कायद्याच्या कलमानुसार फौजदारी कार्यवाही प्रस्तावित करावी तसेच श्री.दिलीप घेवारे हे प्रतिनियुक्तीने नियुक्त अधिकारी असल्याने त्यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सेवा त्वरित संपुष्टात आणावी व शासनाकडे त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करावी व तो पर्यंत त्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी शासनाकडे करण्यात यावी. या विषयासंदर्भात महासभेमध्ये निर्णयाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्र.क्र.२/१ (ल) साठी “ज” अन्वये प्रस्ताव सादर.

स्नेहांकित,

(श्रीमती गीता भरत जैन)

# अनिल दिवाकर सावंत

## स्थायी समिती सदस्य, मिरा भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका (प्रकरण क्रमांक :- ६० करिता)
नगरसचिव विभाग
स.प./न.स./ज.प (पुरक घोषणा)
आवक क्र. 3/93 - 2020 - 21
दिनांक :- 11/ 1 /2021

दि. ११/०१/२०२१

प्रती,
सचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकामा. महासभा 15/01/21 रोजीच्या सभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अंतर्गत 'ज' प्रस्ताव अन्वये प्रस्ताव घेणे बाबत.

गोषवारा : मर्जीतील ठेकेदारास फायदा पोचविण्या करीता संगनमताने आर्थिक भ्रष्टाचार करण्याच्या हेतुने आणि महापालिकेस होणाऱ्या आर्थिक नुकसानाचा विचार न करता करण्यात येणारी निविदा प्रक्रीया त्वरीत रद्द करून भ्रष्टाचारास खतपाणी घालणाऱ्या ठेकेदाराची एकाधिकारशाही संपुष्टात आणून मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मिय उत्सव व विविध कार्यक्रमासाठी मंडप, लाईट, स्टेज, टेबल, खुर्ची, पार्टीशन, स्पीकर सेट, जनरेटर, रेलींग व मनपा निवडणुक व्यवस्था. (अंदाजित खर्च 12,71,18,664) ही निविदा त्वरित रद्द करण्यात यावी. जाचक अटी काढून नवीन निविदा काढण्यात यावी.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार दि. १ जाने रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मिय उत्सव व विविध कार्यक्रमासाठी मंडप, लाईट, स्टेज, टेबल, खुर्ची, पार्टीशन, स्पीकर सेट, जनरेटर, रेलींग व मनपा निवडणुक व्यवस्था. (अंदाजित खर्च 12,71,18,664) ची निविदा महापालिकेचा संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे. या निविदेत महापालिकेमार्फत सर्व धर्मिय उत्सवां करीता आवश्यक उत्सव व विविध कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा व मनपा निवडणुक २०२२ करीता होणाऱ्या खर्चाची एकत्रित निविदा काढलेचे दिसत आहे.

शहरात होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवा करीता सन २०१०/११ मध्ये होणारा खर्च फक्त ६० लाख एवढा असायचा पण सद्द स्थितीत हा खर्च करोडो मध्ये होत असल्याचे दिसुन येत आहे. महापालिकेत गेली अनेक वर्षे ऐकच ठेकेदार सदरचा ठेका घेण्याचे काम लाभलेले आहे आणि त्या

एकाच ठेकेदाराला लाभ मिळावा यासाठी महापालिकेचा बांधकाम विभाग ठेकेदाराकडे पगारावर काम करत असल्या सारखी मेहनत करत असल्याचे दिसुन येत आहे.

शहरामध्ये २०० पेक्षा जास्त मंडप, लाईट व्यवस्था करणाऱ्या अस्थापना/कंपन्या/ठेकेदार असताना फक्त एकाच ठेकेदाराला फायदा मिळावा या दृष्टीने बांधकाम विभाग बाजार भावा पेक्षा चढया दराने ठेकेदाराला देयके अदा करीत असल्याचे दिसते. महापालिकेने प्रकाशित केलेल्या निविदेतील जाचक अटी बांधकाम विभागाच्या मर्जीतील ठेकेदारास फायदा पोचविण्याचा दृष्टीने आणि इतर कोणताही बीडर, अस्थापना अथवा मंडप व्यावसायिक या निविदा प्रक्रियेत भाग घेऊ नये याची संपूर्ण खबरदारी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने घेतलेली आहे. हे आपणा समोर तक्ता निहाय मांडत आहे. त्यानुसार आपण सदरची निविदा त्वरित रद्द करावी.

| **अ. क्र.** | **मर्जीतील ठेकेदारास फायदा पोचविण्यासाठी निविदेत टाकण्यात आलेल्या जाचक अटी** | **निविदा रद्द करण्याची कारणे** |
|---|---|---|
| १. | मर्जीतील ठेकेदारास फायदा पोचविण्यासाठी ५ वर्षाची निविदा काढण्यात आलेली आहे. | या ठेकेदारास महापालिका मागील अनेक वर्ष चढया दराने देयके अदा करून महापालिकेचे आर्थिक नुकसान करीत आहे. |
| २. | वार्षिक उलाढाल ही मागील ५ वर्षाची मागितली आहे. | ठेकेदाराला फायदा मिळावा या हेतूने ही अट दिल्या असल्याचे दिसून येत आहे. सदरची अट रद्द करावी. |
| ३. | निविदेच्या किमती एवढे त्याच प्रकारचे कमीतकमी काम करणे बाबतची अट टाकण्यात आली आहे. | महापालिकेने सर्व धर्म उत्सवा करीता वार्षिक निविदा काढण्यात यावी. |
| ४. | निविदेप्रमाणे चालू असलेले काम आणि केलेल्या कामाची माहितीची अट टाकण्यात आलेली आहे. | सध्या लॉकडाउन कोविद काळ असल्याने अश्या प्रकारचे कोणतेही मंडप सजावटीचे किंवा त्या स्वरूपाचे काम सुरु नसल्याने सदरची अट काढण्यात यावी. |
| ५. | सर्व धर्मीय उत्सवां बरोबर निवडणूक खर्चाची निविदा सुद्धा काढण्यात आली आहे. | शहरामध्ये निवडणूकां करीता अजून दिड वर्षे शिलक असून निवडणूक खर्चाची निविदा वेगळी काढण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| ६. | इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर लायसेंसची अट टाकण्यात आलेली आहे. तीही कमीतकमी ५ वर्ष पूर्वीचे | सदरच्या निविदेत इलेक्ट्रिकल कामाची प्रमाण मोठे असल्यास इलेक्ट्रिकल कामाची निविदा वेगळी करण्यात यावी कारण मंडप बांधणे, खांबे लावणे, खुर्ची देणे, टेबल पुरवठा करणे, कारपेट व इतर साहीत्य पुरवणे करता इलेक्ट्रिकल प्रमाणपत्राची गरज लागत नाही. तरी सदरची अट काढून टाकण्यात यावी. |
| ७. | साधन, सामुग्री, वाहने, मंडप सामान, यंत्र सामुग्री याची यादी मागण्यात आलेल्या आहेत. | बीड क्षमता आणि अनुभव यामध्ये जर निविदा धारक पूर्ण करत असल्यास सदरची जाचक अट टाकणे गरजेचे नाही. सदरची अट काढून टाकण्यात यावी. |
| ८. | तांत्रिक कर्मचारी व त्यांच्या शिक्षणाची आणि अनुभवाची अट टाकण्यात आलेली आहे. | मंडप व्यवसाय करणाऱ्या आस्थापने मध्ये तांत्रिक शिक्षणाची गरज भासत नाही तासह सदरचे काम अकुशल श्रमिक कामगारां कडून करावयाचे काम आहे. तरी स्पर्धात्मक निविदे प्रक्रिये करता अश्याप्रकारची जाचक अट काढून टाकण्यात यावी. |
| ९. | दोन ईलेक्ट्रीकल सुपरवाईजर आणि इलेक्ट्रिकल ईंजिनिअर यांची निविदा धारकाच्या पे रोल वर असण्याचे जाचक अट टाकण्यात आलेली आहे. | स्पर्धात्मक निविदे करता सदरची अट काढण्यात यावी. ईतर कोणत्याही महानगर पालिकेंच्या निविदेत सर्वधर्मिय उत्सवां करीता किंवा इतर निवडणूक कामाचा निविदेत इलेक्ट्रिकल ईंजिनिअर्सची अट घालण्यात आलेली नाही. |
| १०. | ॲडिश्नल सेक्युरिटीची अट टाकण्यात आलेली आहे. | महापालिकेचे वर्षानुवर्ष आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व जास्तीत जास्त बीडर/अस्थापना/व्यावसायिकांनी निविदा |

| | | |
|---|---|---|
| | | प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक असल्याने सर्व धर्मीय उत्सवा करता होणारी निविदा प्रक्रियेत वार्षिक निविदा काढण्यात यावी. तसेच निवडणुकिस अजूनही दीड वर्षापेक्षा जास्त काळ असल्याने निवडणुकी करता होणारी खर्चाची निविदा निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर काढण्यात यावी. |

आपणास विनंती आहे की वरील तक्त्यामध्ये नमूद कारणे विचारात घेऊन जास्तीत जास्त बीडर, अस्थापना अथवा मंडप व्यावसायिक या निविदा प्रक्रियेत भाग घेऊन महापालिकेस होणारा आर्थिक नुकसान कमी करावे व भ्रष्टाचारास खतपाणी घालणाऱ्या ठेकेदाराची एकाधिकारशाही संपुष्टात आणावी. जाचक अटी काढून नवीन निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

आपला

अनिल दिवाकर सावंत

राजीव ओमप्रकाश मेहरा

नगरसेवक, मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रकरण क्रमांक :- ६७ करिता

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ४/७४-२०२०-२१
दिनांक - ११/१/२०२१

प्रती, दि. – ११/०१/२०२१

सचिव,

मिरा भाईंदर महानगरपालिका,

भाईंदर (प.).

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकामा. महासभा 15/01/21 रोजीच्या सभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अंतर्गत 'ज' प्रस्ताव अन्वये प्रस्ताव घेणे बाबत.**

**गोषवारा : स्व. भारतरत्न इंदिरा गांधी हॉस्पिटल च्या इमारतीचे सुरू असलेले दोन मजले वाढविण्याचे निकृष्ट आणि निष्काळजीपणे होणारे काम, अनुभव नसलेल्या अकुशल ठेकेदारा कडून निकृष्ठ दर्जाच्या बांधकामा करीता विभाग अधिकारी, कन्सलटंट, आर्किटेक्ट, थर्ड पार्टी ऑडिटर आणि ठेकेदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करून बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतींची सखोल चौकशी लावणे बाबत.**

संदर्भ : १. जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांचे कडील दि. २३/०६/२०२० रोजीचे पत्रात नमूद संदर्भ क्र १ – १६ मधील निकृस्ठ कामा बाबत तक्रारी.

२. जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांचे कडील दि. १०/०६/२०२० रोजीचे ई–मेल द्वारे पाठविलेले पत्र.

३. कामाच्या ठिकाणी ३०/१०/२०२० रोजी केलेली पहाणी.

४. दि. ०१/११/२०२० रोजी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांचे कडील पत्र.

५. मे. स्पार्क सिव्हील इन्फ्राप्रोजेक्ट ठेकेदार यांना देण्यात आलेले नोटीस ईमेल द्वारे पत्र

६. दि. २७/११/२०२० रोजी मा. प्राचार्य भाऊसाहेब पोलिटेकनिकल यांना देण्यात आलेले पत्र.

महोदय,

स्व. भारतरत्न इंदिरा गांधी हॉस्पिटल च्या इमारतीचे सुरू असलेले दोन मजले वाढविण्याचे निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून येत आहे. ठेकेदार योग्य मानांकने / पद्धती न वापरता, काम करत नसल्याबाबत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना यापूर्वी सुद्धा कळविले आहे.

दिनांक ३०/१०/२०२० रोजी या ठिकाणी कनिष्ट अभियंता सचिन पाटील, ठेकेदार आणि त्याचे सूपरवायजर यांच्या सोबत माझ्या तोंडी तक्रारी नुसार पाहणी केली असता खलील प्रमाणे कामा मध्ये अति महत्वाच्या त्रुटि दिसून आल्या आहेतः

१. या इमारतीचे काम करताना ठेकेदारा मार्फत वापरण्यात येणारे शाटरिंगचे सामान निकृष्ट दर्जाचे असून त्यांच्या बांधणी मध्ये त्रुटि आढळून आलेल्या असून त्याबाबत कनिष्ठ अभियंता यांना अवगत करण्यात आलेले आहे.

२. ठीक ठिकाणी स्लॅब व बिम च्या कामा मध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटि आढळून आल्या आहेत.

३. लिफ्टचा गाळा बनवताना उभी करण्यात आलेली भिंत समांतर रेषेत नसल्याचे दिसुन आलेले आहे.

४. संपुर्ण इमारतीत बनवण्यात आलेले टायबीम चुकीची पद्धत वापरुन बनविण्यात आलेले असून जागोजागी टायबीमच्या बांधकामात कमी जास्त साइज, फुगिरपणा दिसून येत आहे. टायबीम समांतर रेषेत नसून निकृस्ठ दरज्याचे अकुशल कामगारा मार्फत शटरिंगची बांधणी केल्याने जागो जागी बाहेरच्या दिशेने झुकल्याचे दिसून येत आहे.

५. तिसऱ्या मजल्यावरील नव्याने बांधकाम करताना निकृष्ट दरज्याचे शटरिंग, अकुशल कामगार, देखरेखीची कमतरता, कन्सलटंटचा बेजबाबदारपणा, रचनात्मक आराखड्यातील कमतरता / चुका यामुळे बीम झुकलेले असल्याचे / त्यामध्ये हंच आल्याचे दिसत आहे. हे अक्षम्य आहे.

६. वाढवण्यात आलेल्या पीलर / कॉलम साठी वापरण्यात आलेली शटरिंग तांत्रिक दृष्ट्या योग्य नसल्याने कॉलम एका रेषेत नसून त्याची जाडी कमी जास्त झाल्याचे दिसुन येत आहे.

७. जिन्याचे काम करताना सम पातळीत काम होत नसल्याचे ठेकेदार तसेच कनिष्ठ अभियंत्यास निदर्शनास आणून दिलेले आहे.

८. इमारतीच्या चारी बाजूने असलेल्या पीलरला पीलर पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक पीलरला १२ जागी पंक्चर करून एकूण १८० ठिकाणी नव्याने होल करून सज्याचे बांधकाम

करत असल्याचे दिसुन येत आहे. थोडक्यात ही संरचनाकार आणि आर्किटेक्ट यांनी बनवलेल्या आराखड्यामधील अक्ष्यम चूक आहे.

सदरच्या कामा मध्ये नेमण्यात आलेले कन्सलटंट, थर्ड पार्टी ऑडिटर यांचे कामाकडे पुर्णपणे दुर्लक्ष असून मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रत्येक पीलरला कन्सलटंट आणि आर्किटेक्ट च्या चुकीमुळे १०८ ठिकाणी पंक्चर करून नव्याने सज्याचे काम करावे लागत आहे.

या पुर्वी दि. २३/०६/२०२० रोजीच्या पत्राने आपणास शहरात सुरू असलेल्या विविध कामांबाबत बांधकाम विभागाचा बेजबाबदार पणा महापालिका निधिचा दुरुपयोग, अनावश्यक कामे करण्याचे विशेष पद्धती बाबत कळविले आहे त्यावर आपण कोणतीही कार्यवाही आजपर्यंत केलेली नाही.

या पूर्वी सुद्धा वेळोवेळी दिलेल्या तक्रारी बांधकाम विभागा कडून करण्यात आलेल्या कामामधील त्रुटि लक्षात न घेता बांधकाम विभाग, ठेकेदार, कन्सलटंट आणि थर्ड पार्टी ऑडिटर यांच्या आपसातील संगनमताने शहार्वसीयांकडून टॅक्स च्या रूपाने जमा केलेला पैसा वाया घालवत असल्याचे आपणास कळविले आहे.

निकृष्ट दरज्याचे शाटरिंग, अकुशल कामगार अनुभवी नसलेल्या एजन्सीच्या देखरेखीचा अभाव, थर्ड पार्टी ऑडिटरचे ठेकेदारशी आणि विभागाशी केलेले संगनमत आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य, संथ गतीने चाललेले ठेकेदाराचे काम, विभागाच्या अधिकाऱ्यांची कामाकडे जाणून बुजून केलेले दुर्लक्ष्य या सर्व बाबी लक्षात घेता आपणाकडून ठेकेदाराची देयके गोठवण्यात यावीत, करण्यात आलेले दर्जाहीन काम रद्द करण्यात यावे, कन्सलटंट, आर्किटेक्ट, थर्ड पार्टी ऑडिटर, बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्यावर त्वरित या निकृष्ट कामाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अश्याप्रकारच्या शहरातील इतर ही निकृष्ट कामे व हॉस्पिटलचे बांधकाम समोर ठेऊन विभागाची सखोल चौकशी लावण्यात यावी.

आपला

Rajeev

राजीव ओमप्रकाश मेहरा

# मदन उदितनारायण सिंह

**नगरसेवक**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

ऑफिस : शॉप नं. १०, राजपूत पॅलेस, आर. एन. पी. पार्क, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.
दूरध्वनी : 28151461 मोबाईल : 9322598737


मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. मी.भा./न.प./न.स./लक्षवेधी/१-२०२०-२१
दिनांक:- ११/१/२०२१

जावक क्र.: ____

दिनांक : ____

**दि.१५/०१/२०२१ रोजीच्या मा.महासभेकरिता**

**// लक्षवेधी //**

दि.१०/०१/२०२१

**प्रति,**
**मा.नगरसचिव**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मिरा भाईंदर हद्दीतील सर्व खाजगी शाळामार्फत आकारण्यात येणारे अतिरिक्त शालेय शुल्क कमी करणेबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत खाजगी शाळांमार्फत पालकाकंडे शाळा सुरु नसतानाही अतिरिक्त शालेय शुल्क भरणा करण्याची वारंवार मागणी केली जात आहे. कोरोना पार्श्वभुमीवर सर्व शाळांना ऑनलाईन शिक्षण सुरु करणेची परवानगी देण्यात आली त्यानुसार शाळांनी ऑनलाईन शाळा सुरु केल्या. परंतु शासनाने **नर्सरी ते दुसरी पर्यंत ऑनलाईन शाळेस मान्यता दिली नसतानाही काही शाळामार्फत सदरचे ऑनलाईन क्लासेस बळजबरीने सुरु करुन त्याबाबत शालेय फी चा भरणा करणेकरिता सांगणेत आले. तसेच इयत्ता तीसरी ते दहावी पर्यंत ऑनलाईन शाळा सुरु केल्या गेल्या परंतु शाळेमार्फत संगणक फी, लॅब फी,टर्म फी तसेच इतर अनावश्यक शुल्क यांचा भरणा लवकरात लवकर करणेबाबत पालकांना कळविण्यात आले.**

वास्तविक दि. **<u>०८/०५/२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी जर काही शैक्षणिक सुविधांचा वापर करावा लागला नाही व त्याबाबतचा खर्च कमी होणार असल्यास पालकांच्या कार्यकारी समितीमध्ये तसा ठराव करुन त्याप्रमाणे योग्य प्रमाणात फीस कमी करावी</u>** असा स्पष्ट उल्लेख असतानाही **खाजगी शाळांमार्फत सरसकट संपुर्ण वर्षाची अतिरिक्त शालेय शुल्क फी आकारले जात आहे. याबाबत काही पालकांची शाळेवर मोर्चा नेला असता फक्त ठराविक पालकांची फी कमी करुन इतरांची मात्र संपुर्ण शालेय फी आकारली जात असल्याचे माझ्या निर्दशनास आलेले आहे.**

कोरोना लॉकडाऊन काळात सर्व शाळा बंद असतानाही शाळेतील सुविधांचा वापर कमी होतो त्यानुसार शाळेने शालेय फी कमी करणे आवश्यक आहे. लॉकडाऊन काळात अनेक पालक वर्ग तसेच नागरिक यांची नोकरी/व्यवसाय वरुन कमी करण्यात आले असते असतानाही त्यांच्या आर्थिक चणचण असतानाही शालेय प्रशासनामार्फत मानवतेच्या दृष्टीने विचार न करता संपुर्ण शालेय फी भरण्याची सक्ती केली जाते व तसे न केल्यास पाल्यास शाळेतुन कमी करण्यात येईल असे सांगण्यात येते.या सर्व प्रकाराबाबत पालकांच्या माझ्याकडे वारंवार विनंती येत आहेत.

तरी महोदय **मा.महासभेने मिरा भाईंदर हद्दीतील सर्व खाजगी शाळाबाबत अतिरिक्त शालेय फी शुल्क न आकारता फक्त अर्ध्या वर्षाचे शालेय शुल्क आकारणेबाबत** ठराव पारित करुन त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी करणेकरिता धोरण निश्चित करण्यात यावे अशी मी लक्षवेधी मा.महासभेसमोर मांडत आहे.

आपला विश्वासू,

(मदन उदितनारायण सिंह)
**नगरसेवक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत,
श्री. /श्रीमती ....शिक्षणाधिकारी....
मिरा भाईंदर महानगरपालिका

सदरची लक्षवेधी दि. १५/१/२०२१ रोजीच्या मा. महासभेकरिता ... प्रत माहितीस्तव अग्रेषित करण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका